असा. क्र. ३१

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, जून २६, २००६/आषाढ ५, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

---

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.**—औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. | २२७-२२८ |

दिनांक १७ जून २००६ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

(मा. राष्ट्रपतींनी संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २६ जून २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम)

**औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम**

१९४७ चा १४. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौपन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, औद्योगिक विवाद (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००३ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९४७ चा अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मधील, खंड (ध) मधील, उप-खंड (चार) मध्ये, " एक हजार सहाशे रुपयांहून " या मजकुराऐवजी " सहा हजार पाचशे रुपयांहून " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९४७ चा १४.

सन १९४७ चा अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ९क ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ९क मध्ये, परंतुकामधील,—

(क) खंड (ख) मध्ये, " ; किंवा " हा शब्द शेवटी जादा दाखल करण्यात यावा ;

(ख) खंड (ख) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (ग) विद्यमान यंत्रसामग्रीच्या अद्ययावतीकरणामुळे किंवा पुन:स्थापनेमुळे, संगणकीकरणामुळे किंवा स्थावर मालमत्तेत वाढ झाल्यामुळे आणि उत्पादनात वाढ झाल्यामुळे बदल करण्यात आला असेल तर, आणि,—

(एक) अशा बदलामुळे कामगारांच्या एकूण वेतनावर आणि त्यांच्या कामाच्या तासांवर परिणाम होणार नसेल, त्या बाबतीत ; आणि

(दोन) नवीन कामाचे कौशल्य प्राप्त व्हावे म्हणून नियोक्ता, कामगारांना प्रशिक्षण इत्यादीसारख्या सर्व कायदेशीर आणि आवश्यक सुविधा पुरवीत असेल, त्या बाबतीत.".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई